Sr. No.	Type of Suction Pump	मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी निविदेत सादर केलेले दर	मे. गणेश डेव्हलपर्स यांनी निविदेत सादर केलेले दर (L1 निविदाधारक)	मे. गणेश डेव्हलपर्स यांनी वाटाघाटी नंतर मान्य केलेले दर (L1 निविदाधारक)
1	SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL, OPERATIONAL AND MAITENANCE AND TRANSPORTATION ETC. - 10 HP	RS. 590/- PER HRS.	RS.560/- PER HRS.	**RS. 498/- PER HRS.**
2	SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL, OPERATIONAL AND MAITENANCE AND TRANSPORTATION ETC. - 15 HP	RS. 640/- PER HRS.	RS.610/- PER HRS.	**RS. 593/- PER HRS.**

मे. गणेश डेव्हलपर्स यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दरानुसार तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून निविदा दर स्विकारणेस व रु. 50.00 लक्ष खर्चास ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

राकेश शाह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

स्नेहा पांडे :-

सभापती महोदय पंप हर साल लगाए जाते है जंहां पाणी भरता है लेकीन रात को जण बारीश होती इमर्जेन्सी में सूबह सूबह पंप चालू करनार पडता है डिझेल नही पेट्रोल नही ऐसा आन्सर आता है और ऑपरेटर जगह पे नही रहता है तो जिसको भी ठेका देरहे हो उन के कॉन्ट्रॅक्टरसे बात करके रखना है की उनका ऑपरेटर डे और नाईट दोनो टाईम रहना चाहिए बारीश कब आयेगी बता के नही आती है और उनके पंप में डिझेल और पेट्रोल फूल रहना चाहिए बहोत बार ऐसा होता है की पेट्रोल नही है अभी पंप खूलेगा पेट्रोल आएगा तो पंप चालू होगा तब तक पाणी ऐसा ही भरा रहेगा.

कमलेश भोईर :-

पाऊस जेंव्हा जोरात असतो आमच्या वार्ड मध्ये पंपासाठी प्रॉब्लेम होतो. डिझेल नाही पेट्रोल नाही अशी उत्तर असतात. नाले सफाई अजून झालेली नाही. पंप ब्रेकडाऊन होतात.

अति. आयुक्त :-

ह्या वेळेस नविन घेतोय त्यामुळे ब्रेकडाऊन होणार नाही.

कमलेश भोईर :-

हे काम करतच नाही सभापती अजूनही पाहणी करायला आले नाही. अधिकारी बोलले पाहणी करायला येणार अजून देखील आले नाही.

मा. सभापती :-

मी तुम्हाला अडचण असेल तेव्हा फोन करुन सांगितले.

कमलेश भोईर :-

हो पण मी वाट बघीतली ना.

मा. सभापती :-

अडचण आली म्हणून तुम्हाला समोरुन सांगितले सभा संपल्यावर व्हीजीटला जाऊ.

कमलेश भोईर :-

तिकडे नाले सफाई झाली नाही लोकांच्या घरात पाणी जाते.

मा. सभापती :-

भोईर साहेब मी आज पण नाले सफाई बद्दल पत्र दिले आहे . ते काम करून घेणार कोरोनामुळे सर्व त्रास झालेले आहेत . पावसाळ्यासाठी सर्व एसआयचे नंबर द्या तुम्हाला अडचण आली तर त्यांना फोन करा.

अनिल सावंत :-

आयुक्त साहेब हा ठेकेदार गेल्या वर्षीचाच आहे का . गेल्या वर्षीचा अनुभव असा आहे 68 लाख रूपऐ आपण खर्च केले आहेत. त्याने किती ठिकाणी पंप लावला सखल भाग किती पॉईन्ट आऊट केले आपण 68 लाख खर्च केले एस आयला फोन करा कॉन्ट्रॅक्टर कधी जागेवर नसतोच वार्ड ऑफीसरला फोन करा मोटर अव्हेलेबल नाही डिझेल नाही कामगार नाही आणि त्याच कॉन्ट्रॅक्टरला पून्हा तुम्ही ठे का देता सडलेल्या मोटर घेऊन येतो कधीच चालू होत नाही . शितल नगर मध्ये गेल्यावर्षीचा हा अनुभव आहे मोटर मागून मागून थकलो दोन सखल भागात खूप पाणी साचते तिकडे ऑपरेटर पण नाही आणि डिझेल पण नसते वॉर्ड ऑफिसरला सांगितल्यावर ते बोलतात साहेब त्याच्याकडै ना ही तर आम्ही काय करु हे एसी केबिनतध्ये बसणार आणि ठेकेदार वर्षानुवर्ष तोच ठेकेदार पालिका लाखो रुपये नागरिकांच्या टॅक्सनी भरता आणि नागरिक पाण्यामध्ये.

निला सोंस :-

सभापती महोदय आप अधिकारीसे पूछ सकते है हर साल कितना खर्चा होता है खर्च होने के बाद भी सॅटीफॅक्शन नही है. नाही सर्वीस है की कितने घंटे यूज हूआ है मेरा सुझाव है इतने पैसे खर्च करने है तो मनपा खूद खरीद सकती है मशीन की कई सालो गॅरेंन्टी व्हॉरंन्टी होती है यहां ना सर्व्ही स मिल रही है ना हमारे पास अॅसेट है हम लाखो रुपये पे कर रहे है तो मेरा सुझाव है की यह पंप हम खरीद सकते है अपना अॅसेट बना सकते है एन्ड ऑफ द डे इन्फ्यॅक्ट जिस सोसायटी में लगातार प्रॉब्लेम है वहां दे सकते है तो वो सस्ता पडेगा और पब्लिक खूश होगी यहां लाखो रूपए खर्च करके रिझल्ट झिरो है.

मा. सभापती :-

इस बार लेट हो गया तो इस साल रहने देते है अगली बार पहले से डिसाईड करेंगे.

मा. अति. आयुक्त :-

ज्या दिवशी पाऊस पडेल.

अनिल सावंत :-

त्याच वेळी नसतात ना.

मा. अति. आयुक्त :-

मॅडम बोलतात खरेदी करा.

अनिल सावंत :-

खरेदी करून फायरब्रिगेडचा जो स्टाफ आहे . त्यांना ह्या ठिकाणी उपयोगात आणू शकतो तर आपले करोडो रूपऐ वाचतील वर्कआऊट करा ठेकेदार ठेका घऊन जातो मोटार कधी मिळतच नाही.

स्नेहा पांडे :-

मोटार बंद है डिझेल नही है ऑपरेटर नही है 50 बहाने.

दिनेश जैन :-

सभापती महोदय अगर मशी न लेते है तो कन्टीन्हयू यूज में आती है तो 100% सही रहती है| महापालिकेने फवारणी की मशीन ली थी तो फवारणी की मशीन है | वो युज नही करते तो वो मशिन मिरा रोड प्रभाग कार्यालय में ऐसे ही पडी है| यह मशीन है ना पंप हमने खरीद लिए उसको बारा महिना मेंन्टेन करना पडेगा| सही टाईम पे वो मेंन्टेन नही है तो बारीश में उसका उपयोग नही होगा उसके लिए मॅनपावर लगेगा बारीश में मनपा का स्टाफ कम रहता है | अगर वो सही टाईम पे नही पहूचेंगे तो हम किसको बोलेंगे यह सारी चिजे बैठ के डिस्कशन करके निर्णय पे पहूंचे ताकी मेरे हिसाब से बेटर रहेगा|

अनिल सावंत :-

बोलोना वो ठेकेदार मिलता नही है.

दिनेश जैन :-

वो रेट पुछता है.

अनिल सावंत :-

उसको करना ही नही है 30 मोटर लगाऐगा उसमेंसे 15 मोटर बंद है रेट कितना भी कम दे उसको काम ही नही करना था|

निला सोंस :-

मा. सभापती महोदय आपको सर्व्हीस के उपर ध्यान देना चाहिए| ठेकेदार को बडे कडे रुपसे सर्व्हीस के लिए बोलना चाहिए और अकांऊंन्टीबिली की वो कितना युज हो रहा है उसके बिलींग का आधार क्या है.

कमलेश भोईर :-

ठेकेदार गावी जाऊन बसलेला आहे. नाले सफाई काय झाल.

मा. सभापती :-

बारीश जब भरेगा तो आरोग्य के एस आय को फोन क रीए जिसको सर्व्हीस नही मिली तो मूझे फोन किजीए.

अनिल सावंत :-

सभापती साहेब आप अपने वार्ड में बिझी रहेंगे तो आपको टाईम नही मिलेगा एस आय हमारे फोन नही उठाएंगे कांबळे साहब हमारा फोन नही उठाएंगे.

मा. सभापती :-

में. इतना नसिबवाला हूं की मेरे वार्ड में पाणी भरता नही है.

स्नेहा पांडे :-

इसलिए आप सुखी है हम परेशान है क्यांकी हमको रातको दो बजेसे फोन शुरु हो जाते है मॅडम पाणी भर गया पंप चालू किजीए और पंपवाला गायब है कांबळे साहेब नाला सफाई पे बात करना है अभी तक नाला सफाई हूई नही.

मा. सभापती :-

नाले सफाई की बात आप कर रहे है में असंतृष्ठ हूं.

स्नेहा पांडे :-

सिर्फ वार्ड की बात नही पूरे मिरा भाईंदर की बात है . बडे बडे नालो की अच्छी तरह से सफाई नही हूई आमदार पत्र दे रहे है उसका भी जवाब नही मिला आमदार के पत्र का जवाब नही दे रहे तो नगरसेवक को क्या जवाब देंगे.

मा. सभापती :-

पांडे मॅडम आपके वार्ड मे हम व्हिजीट करेंगे.

स्नेहा पांडे :-

में पत्र देती हुं.

मा. सभापती :-

पूरे शहर में कहां कहां व्हिजीट करना है आप मूझे दिजीए.

स्नेहा पांडे :-

आमदार ने 15-20 दिन पहले पत्र दिया है. उनके पत्र का जवाब मिला नही आरोग्य डीपार्ट मेंन्ट क्या कर रहा है.

प्रकरण क्रं. 16 :-

मनपा क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखळ भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणेकामी भाड्याने 10HP/15HP क्षमतेचे पंप पुरवठा करणे कामाच्या निवीदेतील दरास मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्रं. 17 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पा वसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी सार्व . आरोग्य विभागाकरीता विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे कामी निविदाधारकांनी सादर केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

Sr. No.	Type of Suction Pump	मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी निविदेत सादर केलेले दर	मे. गणेश डेव्हलपर्स यांनी निविदेत सादर केलेले दर (L1 निविदाधारक)	मे. गणेश डेव्हलपर्स यांनी वाटाघाटी नंतर मान्य केलेले दर (L1 निविदाधारक)
1	SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL, OPERATIONAL AND MAITENANCE AND TRANSPORTATION ETC. - 10 HP	RS. 590/- PER HRS.	RS.560/- PER HRS.	**RS. 498/- PER HRS.**
2	SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL, OPERATIONAL AND MAITENANCE AND TRANSPORTATION ETC. - 15 HP	RS. 640/- PER HRS.	RS.610/- PER HRS.	**RS. 593/- PER HRS.**

मे. गणेश डेव्हलपर्स यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दरानुसार तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून निविदा दर स्विकारणेस व रु. 50.00 लक्ष खर्चास ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी सार्व . आरोग्य विभागाकरीता विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे कामी निविदाधारकांनी सादर केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

Sr. No.	Type of Suction Pump	मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी निविदेत सादर केलेले दर	मे. गणेश डेव्हलपर्स यांनी निविदेत सादर केलेले दर (L1 निविदाधारक)	मे. गणेश डेव्हलपर्स यांनी वाटाघाटी नंतर मान्य केलेले दर (L1 निविदाधारक)

1	SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL, OPERATIONAL AND MAITENANCE AND TRANSPORTATION ETC. - 10 HP	RS. 590/- PER HRS.	RS.560/- PER HRS.	**RS. 498/- PER HRS.**
2	SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL, OPERATIONAL AND MAITENANCE AND TRANSPORTATION ETC. - 15 HP	RS. 640/- PER HRS.	RS.610/- PER HRS.	**RS. 593/- PER HRS.**

मे. गणेश डेव्हलपर्स यांनी वाटाघाटी अं ती मान्य केलेले दरानुसार तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून निविदा दर स्विकारणेस व रु. 50.00 लक्ष खर्चास ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदक :- श्री. राकेश शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण् क्रं. 17, मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्रे व मोकाट मांजरांवर निर्बिजीकरण व लसीकरण करणे, जखमी कुत्रे व मांजरांवर उपचार करणे तसेच पिसाळलेले कुत्रे व मांजरे यांचा बंदोबस्त करणे कामाच्या निविदेबाबत.

संजय थेराडे :-

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्रे व मोकाट मांजरावर निर्बिजीकरण व लसीकरण करणे,जखमी कुत्रे व मांजरांवर उपचार करणे तसेच पिसाळलेले कुत्रे व मांजरे यांचा बंदोबस्त करणे कामी दोन वर्षाकरिता ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या.

मे. माय वेटस चॅरीटेबल ट्रस्ट ॲन्ड रिसर्च सेंटर व मे. नवोदय वेट सोसायटी यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

क्र.	तपशील	मे. माय वेटस चॅरीटेबल ट्रस्ट	मे. नवोदय वेट सोसायटी
१.	Sterilization and Anti Rabbies Vaccination of un-sterilized stray Dogs Treatment of injured Dogs and attend all the complaints regarding stray Dogs within the MBMC	१०९० (प्रति श्वान)	१०१७ (प्रति श्वान)
२.	Sterilization and Anti Rabbies Vaccination of un-sterilized Cats, Treatment of injured Cats and attend all the complaints regarding Cats within the MBMC	१०९० (प्रति मांजर)	७२७ (प्रति मांजर)

वरील तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता **मे. नवोदय वेट सोसायटी** यांनी सादर केलेले दर हे वाजवी असल्याने प्राप्त दरास व रु. 40 लक्ष खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

धृवकिशोर पाटील :-

माझे अनुमोंदन आहे.

मा. सभापती :-

मा. आमदार साहेब जी गेल्या दोन वर्षापासुन पत्र दिले आहे. दोन गाड्या असाव्यात.

अनिल सावंत :-

आपण कश्याला वाढ वायच्या त्या ठेकेदार वाढवेल . डॉक्टर साहेब दर वर्षी आपण स्टरलायझेशनसाठी 30-40 लाख खर्च करतो. तरी सुध्दा कूत्रे मांजरी वाढतच जातात . मांजरे तर कमी आहेत.

डॉ. पडवळ :-

आपली लोकसंख्या वाढते तरी त्यांची वाढते.

अनिल सावंत :-

स्टारलायझेशन झाल्यावर वाढणार कशी वाढ कमी पाहीजे. त्याच्यावर आपण 30-30,40-40 लाख खर्च करतो स्प्रे डॉगजला कधी कंम्पलेट केली तर ह्यांचे नसतात. गेल्यावर्षीचा जो ठेकेदार होता तो गेल्यावेळी काम अर्धवट सोडून गेला त्याची इएमडी ह्याच्यावळ पडलेली असेल. नंतर कोण एन्टरटेन करत नाही कारण ठेकेदारच पळून गेला. त्यालाच पून्हा आज आपण ठेका देतो. का त्याला ठेका देतो त्यांनी स्ट्राईक का केला ?

डॉ. पडवळ :-

काम बंद केल होत.

अनिल सावंत :-

आम्ही तेच म्हणणार पळू न गेलो म्हणुन म्हणजेच काम बंद केले तुम्ही त्या ला परत का दिले. त्याने काम बं द केल्यावर त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागला . कारण कधी कारवाई झा लीच नाही हा संशोधनाचा विषय आहे. त्या ठेकेदाराला रेट कमी म्हणून ठेका देतो. त्याची गेल्या वर्षाची इएमडी अजून पडलेली आहे. तो डिफॉल्टर आहे. म्हणून त्याला देतो ते काम तर होणारच नाही कमी रेट आहे डिले होणार आणि पेमेंन्ट होणार म्ह णजे नागरिकांच्या पैशाच्या अपव्यय आहे. ज्यावेळी नागरिकांचे पैसे खर्च करतो त्याचा प्रशासनानी थोडा तरी विचार केला पाहीजे स्टॅन्डींग ला टेंडर द्यायचा ठराव पास करून घ्यायचा आणि नंतर सर्विसच्या नावाने बोंब तो कसे काम करणार ? गेल्या वर्षी तो काम करू शकला नाही तर ह्या वेळेस तो कसे काम करणार ? काय गॅरेंन्टी आहे तुमची तरी सुध्दा तु म्ही टेंडर स्टॅन्डींग समोर ठेवता मा. सभापती महोदय मेरी आपसे रिक्वेस्ट है| इसका पूरा रिपोर्ट प्रशासनसे ले लो और हम लोग 30-30,40-40 लाख स्अरलायजेशन के लिए खर्चा कर रहे है तो उसपे कारवाई होनी चाहिए इतने कूतते कहाँ से बढ रहे है तो उसपे कारवाई होनी चाहिए| इतने कुत्ते कहॉसे आ रहे है | इसका मतलब स्टरलायझेशन नही हो रहा है | यह विषय पेन्डींग रखो, अगली मिटींग मे ले लो | सर, वो डिफॉल्टर है काम नही कर पाया फिर भी वही ठेकेदारों को दे रहे है|

मा. सभापती :-

मेरे कार्यकाल मे शिकायत होगी तो उसके उपर कारवाई होगी| 100% होगी|

डॉ. निराटले :-

काही कालावधी पुरता केली नव्हती . 2015-16 ची गोष्ट आहे. मी त्यावेळी नव्हतो परंतु नंतर मला माहिती भेटली की , ॲनिमल वेलफेयरचे काही नियम आहेत . कुत्रे कसे पकडणार? कसे पिंजऱ्यात ठेवणार? त्यामध्ये तो थोडा कमी झाला होता. नंतर आपण त्याला प्रशासनाकडून ऑर्ड र दिली की काम बंद करा.

अनिल सावंत :-

आता काय गॅरन्टी आहे की तो करणार?

डॉ. निराटले :-

त्यांनी दुसरी 4-5 ठिकाणी कामे केली त्याची आम्ही माहिती घेतली. हैदराबाद, इंदौर सर्व ठिकाणी त्याचे काम चांगले आहे.

स्नेहा पांडे :-

आपने जानकारी लिया पर उनको जानकारी है क्या की क्या क्या करना है?

डॉ. निराटले :-

हॉ. जानकारी है|

स्नेहा पांडे :-

जब कुत्तो बिल्लीयों को लगा रहता है , इन्जर्ड रहते है तो फोन करेंगे तो उधर से अन्सर आ जाता है की हम सिर्फ निर्बिजीकरण करते है|

डॉ. निराटले :-

जखमी कुत्र्याचे आपण प्रत्यक्ष जागेवर जाऊन उपचार करतो . स्थानिकांची मागणी असते की , तुम्ही कुत्र्यांना तिकडे अॅडमिट करा. परंतु आपले सेंटर खुप छोटे आहे.

स्नेहा पांडे :-

तिकडे येऊन पण काही करत नाही. इन्जर्ड आम्ही बघत नाही.

अनिल सावंत :-

डॉक्टर साहेब, मिरारोडला शांती विहारला ओपन केले होते. त्याचे काय झाले?

डॉ. निराटले :-

ते आपले नाही. ते एका संस्थेचे आहे.

अनिल सावंत :-

त्याचे उद्घाटन आमदारांनी केलेले आहे.

डॉ. निराटले :-

ते पालिकेचे नव्हते.

दिनेश जैन :-

ते पालिकेचेच आहे . पण संस्थेला चालवायला दिले होते . आमदारांनी उद्घाटन केले म्हणजे आमदार काम करणार. ते महापालिकेचे काम आहे.

अनिल सावंत :-

हा परंतू पालिकेने ते केले पाहिजे ना.

दिनेश जैन :-

एखाद्या वास्तूचे उद्घाटन आपण नगरसेवकांनी केले तर त्यात आपली काय गलती.

अनिल सावंत :-

प्रशासनाची चूकी आहे. त्यांनी करायला पाहिजे. तुम्ही का करत नाही तिथे चरसी लोक बसतात. महापालिकेचे नाव लागले आहे.

स्नेहा पांडे :-

यावेळी काय काय काम होणार ते सांगा?

धृवकिशोर पाटील :-

मा. सभापतीजी 40 लाखाची तरतूद आहे . 40 लाख डिव्हाईड बाय 1017 रुपये प्रती आपण डिव्हाईड केले तर 3933 म्हणजे 4000 अप्रॉक्सीमेटली आपण मांजरी कुत्र्याचे स्टरलायझेशन करु शकतो. डिव्हाईड बाय 365 डेज कट केले तर आपण दिवसाला फक्त 11 कुत्रा मांजरीचे स्टरलायझेशन करु शकतो.

अनिल सावंत :-

शहरामध्ये कुत्रे किती आहेत. डेली स्टरलायझेशन करणे अपेक्षितच नाही.

धृवकिशोर पाटील :-

लाखो कुत्रे मांजरी आहेत.

अनिल सावंत :-

त्याच्याजवळ सर्व्हे आहे का?

धृवकिशोर पाटील :-

मोअर दॅन एक लाख आहेत.

अनिल सावंत :-

डॉक्टर साहेब सांगा.

डॉ. निराटले :-

गेल्या वर्षी पशूगणना केली आहे. त्याचा अहवाल प्राप्त झाला नाही.

स्नेहा पांडे :-

अहवाल भेटता भेटता अजून वाढ झाली असेल.

धृवकिशोर पाटील :-

घरी आहेत ती कुत्रे मांजरी.

अनिल सावंत :-

तो विषयच नाही. आपण स्टे डॉगचे करतो. स्ट्रीट डॉगचे नाही. तुम्ही म्हणता एक लाख शक्यच नाही.

दिनेश जैन :-

आनेवाले मिटींग में फिगर देना|

अनिल सावंत :-

मेरे वॉर्ड में मॅक्झीमम 1000 होंगे| गेल्या 3 वर्षामध्ये किती कुत्र्याचे स्टरलायझेशन केले. ही जरा फिगर ह्या नंतर कळेल आपल्याला. स्टरलायझेशन होते तर पॉप्युलेशन वाढते कशी.

दिनेश जैन :-

इसमें एक सजेशन है गाव में गाय के कान को एक लेबल लगाया जाता है और उसकी गिनती की जाती है|

अनिल सावंत :-

उनको भी लगाने का है पर वो नही लगाते|

डॉ. निराटले :-

मांजरी कुत्र्यांना आपण लावू शकत नाही. ॲनीमल वेल्फेयरनी ॲक्ट केला आहे.

अनिल सावंत :-

आपण मार्कींग करतो.

डॉ. निराटले :-

ऑपरेशन केल्यावर कान कापतो.

अनिल सावंत :-

आपला पशु वैद्यकीय दवाखाना कुठे आहे?

डॉ. निराटले :-

दवाखाना नाही. आपले निर्बिजीकरण केंद्र आहे.

अनिल सावंत :-

कुठे आहे.

डॉ. निराटले :-

उत्तनला आहे आणि छोटे आहे.

स्नेहा पांडे :-

डॉक्टर इनजर्ड कुत्र्यांना उपचार कुठे करणार?

अनिल सावंत :-

ह्याच्यामध्ये पळून जाणारे ठेकेदार नेमले तर ते तसेच करणार.

मा. सभापती :-

सावंत साहेब आपण त्याला बोलवू आणि बातचीत करु.

प्रकरण क्र. 17 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्रे व मोकाट मांजरांवर निर्बिजीकरण व लसीकरण करणे, जखमी कुत्रे व मांजरांवर उपचार करणे तसेच पिसाळलेले कुत्रे व मांजरे यांचा बंदोबस्त करणे कामाच्या निविदेबाबत.

ठराव क्र. 18 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्रे व मोकाट मांजरावर निर्बिजीकरण व लसीकरण करणे,जखमी कुत्रे व मांजरांवर उपचार करणे तसेच पिसाळलेले कुत्रे व मांजरे यांचा बंदोबस्त करणे कामी दोन वर्षाकरिता ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या.

मे. माय वेटस चॅरीटेबल ट्रस्ट ॲन्ड रिसर्च सेंटर व मे. नवोदय वेट सोसायटी यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

क्र.	**तपशील**	**मे. माय वेटस चॅरीटेबल ट्रस्ट**	**मे. नवोदय वेट सोसायटी**
१.	Sterilization and Anti Rabbies Vaccination of un-sterilized stray Dogs Treatment of injured Dogs and attend all the complaints regarding stray Dogs within the MBMC	१०९० (प्रति श्वान)	१०१७ (प्रति श्वान)
२.	Sterilization and Anti Rabbies Vaccination of un-sterilized Cats, Treatment of injured Cats and attend all the complaints regarding Cats within the MBMC	१०९० (प्रति मांजर)	७२७ (प्रति मांजर)

वरील तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता **मे. नवोदय वेट सोसायटी** यांनी सादर केलेले दर हे वाजवी असल्याने प्राप्त दरास व रु. 40 लक्ष खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. संजय थेराडे अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र . 18, वाहने वाहनचालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाड्याने घेण्या च्या वार्षिक निविदेस मुदतवाढ देणेबाबत.

सुरेखा सोनार :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेत वाहने, वाहनचालक व इंधनासह संपूर्ण सेवा भाडयाने देण्याबाबतची वार्षिक निविदा धारकाने महापालिकेस करारनाम्याप्रमाणे वाहने उपलब्ध करुन दिलेली नाहीत. निविदा धारकाने वास्तविक तीन वर्षाच्या आतील वाहने व T-Permit ची वाहने महापालिकेस उपलब्ध करुन देणे बंधनकारक असताना ठेकेदाराने साधी T-Permit नसलेली वाहने व तीन वर्षाच्या वरील वापरलेली वाहने उपलब्ध करुन दिली. तसेच ठेकेदाराने वाहन चालकांना किमान वेतन प्रमाणे वेतन दिले नाही व वाहन चालकाचा PF, ESIC भरणा केला नाही. यावरुन असे निदर्शनास येते की, ठेकेदाराने करारनाम्याचा भंग केला, महापालिकेस फसविलेले आहे तरीही ठेकेदारास महापालिकेने देयक अदा केले आहे. सदर निविदेची मुदतवाढ संपल्यानंतरही देयक अदा केले आहे. याबाबत प्रशासनाने सखोल चौकशी करावी व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन ठेकेदारास करारनाम्याचा भंग केल्याप्रकरणी व महापालिकेस फसविल्या प्रकरणी काळ्या यादीत टाकावे.

या बाबींचा विचार करता सदर ठेकेदारास मुदतवाढ देणे उचित ठरणार नाही त्यामुळे सदर वार्षिक निविदेस मुदतवाढ नाकारण्यात येत आहे व महानगरपालिकेने वाहने, वाहनचालक व इंधनासह संपूर्ण सेवा भाड्याने घेण्याची नविन निविदा मंजुरीकरीता सादर करावी असा मी ठराव मांडत आहे.

दिनेश जैन :-

माझे अनुमोदन आहे.

अनिल सावंत :-

हा ठेकेदार डिफॉल्टर आहे म्हणून तुम्ही त्याला प्रस्ताव उडवला इतर ठेकेदाराची देखील तीच परिस्थिती आहे. एकाला एक न्याय दुसऱ्याला दुसरा न्याय कशाला.

धृवकिशोर पाटील :-

तो डिफॉल्टर नाही असे डॉक्टर साहेबांनी सांगितले त्यानी जे कॉम्पलायन्स केले म्हणून आपण त्याला देतो.

अनिल सावंत :-

त्याचा अर्थ काय झाला त्याला वर्षाचे काम दिले तो काम सोडून गेला.

धृवकिशोर पाटील :-

सोडून नाही गेला.

अनिल सावंत :-

इथे हीच परिस्थिती आहे.

दिनेश जैन :-

नाही करायचे असे डिपार्टमेंटनी पत्र दिले.

अनिल सावंत :-

डिपार्टमेंट नाही स्टॅन्डिंगने मग तुम्ही त्याच ठेकेदाराला काम करायला देता.

दिनेश जैन :-

ह्यांनी स्वतःनी पत्र दिले आहे आणि डिपार्टमेंटनी सांगितले आहे की करु नका.

अनिल सावंत :-

डिपार्टमेंट सांगते ह्याला काळ्या यादीत टाका.

स्नेहा पांडे :-

डिपार्टमेंट को कमीया नजर आयी इसके लिए काम बंद करने को पत्र दिया| वापस उसीको दे रहे हो|

धृवकिशोर पाटील :-

28 ऑगस्ट 2019 रोजी स्टॅन्डिंग कमिटीने 6 महिन्यांची मुदत वाढ केली होती म्हणजे त्याच्या अगोदर टेंडर संपले होते. डिपार्टमेंट नविन टेंडर न काढता वर्षानुवर्ष ......

मा. अतिरिक्त आयुक्त :-

नविन टेंडरची प्रोसेस चालू आहे.

धृवकिशोर पाटील :-

म्हणजे हे टेंडर 2019 च्या स्टार्टींगला म्हणजे 2019 अख्ख गेलं. 2020 चे अर्ध वर्ष गेले वर्षानुवर्षे असेच चालले आहे . दुसरी गोष्ट त्याने महापालिकच्या अधिकाऱ्यांना , कर्मचाऱ्यांना ही टी परमिटची मागणी केली पाहिजे होती . दुसरी गोष्ट त्याने चांगल्या कंडीशनची गाडी दिली पाहिजे होती . पण तीसुध्दा दिली नाही . असे असताना पालिकेने त्यांना एक वर्षभर पोसले आणि बील दिली आणि त्यांना वार्षिक एक्सटेन्शन सुध्दा दिले एक्स्टेन्शन देऊन देऊन एक वर्ष निघून गेले.

अनिल सावंत :-

ऑडिटरना बोलवा त्यांनी पेमेंट कसे केले.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

28/2 ला ह्यांची मुदत संपलेली आहे . त्यानंतर कोरोना आला आणि आतापर्यंत आपण वाहन पुरवत आहोत. आतापर्यंत जी सेवा दिली आहे त्याचे पेमेंट करण्यापर्यंत परवानगी असावी स्थायी समिती जो निर्णय घेईल त्याप्रमाणे चौकशी करुन कारवाई करायला विभाग तयार आहे.

धृवकिशोर पाटील :-

त्यांनी टी-परमीटची वाहने द्यायला पाहि जे होती ती दिली नाही . चांगल्या कंडीशनमधली वाहन द्यायला पाहिजे होती ती दिली नाही. कसूरदार कोण ठेकेदार, अशा ठककेदाराला एक वर्षभर कोव्हिडच्या नावाखाली बिल करता हे किती चूकीचे आहे . म्हणजे कोव्हीडच्या नावाने काही करावे आणि आपण ते ॲक्सेप्ट करावे. एका ठिकाणी देतो आणि दुसऱ्या ठिकाणी देत नाही. हे पण उचित नाही ना.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

ह्यांनी जी वाहन पुरवली त्याच्यातली बरीच वाहन आपण कोव्हीडसाठी वापरतो . त्यामुळे अत्यावश्यक सेवेमध्ये बंद करता येत नाही.

धृवकिशोर पाटील :-

बरोबर आहे. परंतु आम्ही तुमच्या निदर्शनास दोन बाबी आणून दिल्या तुम्ही इन्क्वायरी करा.

अनिल सावंत :-

कुठली वाहन आपण भाड्याने घेतो . आरोग्य विभागचे एक ट्रॅक्टर चालू आहे , दुसरा ट्रॅक्टर रिपेयरींगसाठी गॅरेजमध्ये आहे. शहरामध्ये वृक्ष छाटणी झालेली आहे. सगळीकडे झाड पडली आहेत. नशिब आहे, जास्त पाऊस नाही पडला. तर ते बघा.

गिता परदेशी :-

झाड छाटून तशीच रोडवर पडली आहेत.

प्रकरण क्र. 18 :-

वाहने वाहनचालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाड्याने घेण्याच्या वार्षिक निविदेस मुदतवाढ देणेबाबत.

ठराव क्र. 19 :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेत वाहने, वाहनचालक व इंधनासह संपूर्ण सेवा भाडयाने देण्याबाबतची वार्षिक निविदा धारकाने महापालिकेस करारनाम्याप्रमाणे वाहने उपलब्ध करुन दिलेली नाहीत. निविदा धारकाने वास्तविक तीन वर्षाच्या आतील वाहने व T-Permit ची वाहने महापालिकेस उपलब्ध करुन देणे बंधनकारक असताना ठेकेदाराने साधी T-Permit नसलेली वाहने व तीन वर्षाच्या वरील वापरलेली वाहने उपलब्ध करुन दिली. तसेच ठेकेदाराने वाहन चालकांना किमान वेतन प्रमाणे वेतन दिले नाही व वाहन चालकाचा PF, ESIC भरणा केला नाही. यावरुन असे निदर्शनास येते की, ठेकेदाराने करारनाम्याचा भंग केला, महापालिकेस फसविलेले आहे तरीही ठेकेदारास महापालिकेने

देयक अदा केले आहे. सदर निविदेची मुदतवाढ संपल्यानंतरही देयक अदा केले आहे. याबाबत प्रशासनाने सखोल चौकशी करावी व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन ठेकेदारास करारनाम्याचा भंग केल्याप्रकरणी व महापालिकेस फसविल्या प्रकरणी काळ्या यादीत टाकावे.

या बाबींचा विचार करता सदर ठेकेदारास मुदतवाढ देणे उचित ठरणार नाही त्यामुळे सदर वार्षिक निविदेस मुदतवाढ नाकारण्यात येत आहे व महानगरपालिकेने वाहने, वाहनचालक व इंधनासह संपूर्ण सेवा भाड्याने घेण्याची नविन निविदा मंजुरीकरीता सादर करावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. सुरेखा सोनार अनुमोदक :- श्री. दिनेश जैन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र . 19, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणे कामाच्या निविदेस मुदतवाढ देणे.

दिनेश जैन :-

मिरा भाईंदर महापालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने कार्यरत वाहनचालकांना ठेकेदाराने किमान वेतन नुसार वेतन अदा केले नाही तसेच सदर वाहन चालकांचा PF व ESIC भरणा केला नाही. त्यामुळे सदर ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी. प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार ठेकेदाराची मुदत दि.३१/१२/२०१९ रोजी संपुष्टात येवूनही आजतागायत नविन निविदेची कार्यवाही केली नाही व नविन निविदा प्रक्रिया कधी पूर्ण होईल याचा कालावधीही दिलेला नाही. त्यामुळे किती कालावधी पर्यंत मुदतवाढ द्यावी व किती खर्च अपेक्षित आहे याचा उल्लेख नसल्याने मुदतवाढ देणे उचित ठरणार नाही.

सबब, मिरा भाईंदर महापालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणे कामाच्या निविदेस मुदतवाढ नाकारण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

राकेश शाह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

धृवकिशोर पाटील :-

ड्रायव्हर लोकांना इ.एस.आय.सी. व पी.एफ मिळत नाही अशी त्यांनी महापौरांना तक्रार केली.

प्रकरण क्र. 19 :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणे कामाच्या निविदेस मुदतवाढ देणे.

ठराव क्र. 20 :-

मिरा भाईंदर महापालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने कार्यरत वाहनचालकांना ठेकेदाराने किमान वेतन नुसार वेतन अदा केले नाही तसेच सदर वाहन चालकांचा PF व ESIC भरणा केला नाही. त्यामुळे सदर ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी. प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार ठेकेदाराची मुदत दि.३१/१२/२०१९ रोजी संपुष्टात येवूनही आजतागायत नविन निविदेची कार्यवाही केली नाही व नविन निविदा प्रक्रिया कधी पूर्ण होईल याचा कालावधीही दिलेला नाही. त्यामुळे किती कालावधी पर्यंत मुदतवाढ द्यावी व किती खर्च अपेक्षित आहे याचा उल्लेख नसल्याने मुदतवाढ देणे उचित ठरणार नाही.

सबब, मिरा भाईंदर महापालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणे कामाच्या निविदेस मुदतवाढ नाकारण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदक :- श्री. राकेश शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 20, निवीदांना मान्यता देणे. (फेरप्रस्ताव) (सार्व. बांधकाम विभाग)

धृवकिशोर पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बी.एस.यु.पी. योजने अंतर्गत अर्धवट राहीलेल्या इमारतीची कामे करण्यासाठी खालीलप्रमाणे निविदा मागवून मा. स्थायी समिती सभा दि.१६/०३/२०२० मध्ये सादर करण्यात आल्या होत्या.

अ क्र	टेंडर आय डी	कामाचे नाव	अंदाजित खर्च
१	२	३	४
१.	४७३१३१_१	मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जनता नगर बी.एस.यु.पी. प्रकल्पातील इमारत क्र. ७ चे बांधकाम करणे.	रु.४२,१०,९०,७२०/-
		मे. शायोना कॉर्पोरेशन	रु.४४,८१,०७,५९१.५६/- दरवाटाघाटीनंतर रु. ४४,८१,०७,५९२/- (सन २०१९-२० च्या राज्यदरसुचीतीलदराशी तुलना करता ५.९३ ७ जास्त दराने)
		मे. देव इंजिनिर्यस मे. गजानन कंन्स्ट्रक्शन मे. कोठारी लॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि.	रु.५२,४७,९९,११२.२६/- रु.५१,३०,७०,५४५.४१/- रु.४८,४३,५२,१८८/-
२.	४७३११५_१	मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जनता नगर बी.एस.यु.पी. प्रकल्पातील इमारत क्र. ४ चे बांधकाम करणे.	रु.३२,९२,४१,१५५/-
		मे. शायोना कॉर्पोरेशन	रु.३६,५५,७७,१७३.९२/- दरवाटाघाटीनंतर रु. ३५,७५,६८,१७८/- (सन २०१९-२० च्या राज्यदरसुचीतीलदराशी तुलना करता ८.२४ ७ जास्त दराने)
		मे. देव इंजिनिर्यस मे. गजानन कंन्स्ट्रक्शन मे. कोठारी लॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि.	रु.३८,६९,२५,०८६.७३/- रु.४०,०२,७५,६०२.६५/- रु.३७,६९,६३,७३८.७५/-

३.	४७३१२४_१	मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील जनता नगर बी.एस.यु.पी. प्रकल्पातील इमारत क्र. ५ चे बांधकाम करणे.	रु.३४,९२,७८,५९५/-
		मे. शायोना कॉर्पोरेशन	रु.३७,५९,८१,१७७.४२/- दरवाटाघाटीनंतर रु. ३७,५९,८१,१७७/- (सन २०१९-२० च्या राज्यदरसुचीतीलदराशी तुलना करता ७.२४६ जास्त दराने)
		मे. देव इंजिनिर्यस मे. गजानन कंन्स्ट्रक्शन मे. कोठारी लॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि.	रु.४१,०३,३६,२१३.०२/- रु.४२,७१,६९,०३३.०६/- रु.३९,९९,३९,५०२.९९/-

वरील कामांकरीता ठराव क्र. ११७ अन्वये फेरनिविदा मागविण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. महापालिका प्रशासनाने ठरावातील काही बाबींचा ठराव विखंडीत करण्यासाठी शासनाकडे सादर केला असुन शासनाकडून याबाबत निर्णय झालेला नाही. प्रशासनाने सदर निविदांना मंजूरी देण्यासाठी फेर प्रस्ताव सादर करण्यात आलेला असल्याने प्रशासनाने उपरोक्त काम ठेकेदाराकडून मुदतीत पूर्ण करुन घ्यावे. सदर कामास ठेकेदारास कोणतीही दरवाढ किंवा एक्सेलेशन (Escalation) देवू नये ठरलेल्या दरातच व वेळेतच काम करुन घ्यावे. सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार जी.एस.टी. रकमेसह मान्यता देण्यात येत आहे.

राकेश शहा :-

माझे अनुमोदन आहे.

अनिल सावंत :-

मा. सभापती महोदय 16 मार्चला स्टॅनिडंग कमिटीमध्ये हा प्रस्ताव आला होता . जे.एन.एन.यु.आर.एम ही योजना पंतप्रधान मनमो हन सिंग असताना महत्वकांक्षी योजना ह्या शहरामध्ये आली. ही योजना आ णण्यामागे उद्दे शच हा होता की जी लोक झोपडपट्टी स्लम एरियामध्ये राहतात त्यांचे जीवनमान सुधारावे आणि त्यांना बिल्डींगमध्ये जागा मिळावी . आज 12-13 वर्ष झाली अजून ही ती योजना अर्धवट अवस्थेत आहे . त्यामध्ये ठेकेदार कारणीभूत असेल . प्रशासन कारणीभूत असेल . हा प्रस्ताव 16 मार्चला स्थायी समितीसमोर आला होता . ह्याच्यामध्ये तिन्ही कामाच्या निविदा आहेत त्यामध्ये ठराव करुन त्या निविदा वगळण्यात आल्या. कारण काय देण्यात आले निविदा क्र . 28,29,30 ह्या कामाची निविदा प्रशासनाने प्रसिध्द केली होती. परंतु सदर निविदा धारकाने काम पूर्ण केलेले नाही. त्या उपर पालिका प्रशासनाने काही मटेरियलचे दर वाढल्याने निविदेमधील साहित्याचे दर वाढवून निविदा धारकास कळविण्यांत आले . तरीसुध्दा निविदाधारकाने काम पूर्ण केले नाही . वारंवार प्रशासनाने निविदाधारकास पत्रव्यवहार व नोटिस देऊनही निविदाधारकाने प्रतिसाद न दिल्याने प्रशासनाने त्याचे काम रद्द करुन उर्वरित कामाची निविदा प्रसिध्द केली व त्याच निविदा धारकाने प्रसिध्द केलेली निविदा भरलेली आहे. ती पून्हा पाहता सदर निविदाधारक हे काम पूर्ण करु शकणार नाही . त्यामुळे सदर निविदा धारकास ह्या कामाकरिता काळ्या यादीत टाकावे. 16 मार्चला ह्या निविदाधारकाला काळ्या यादीत टाकले आणि ही निविदा रद्द करुन पुन्हा प्रसिध्द करावी व कामाची निकड पाहता निविदा भरण्याचा कालावधी कमी करावा असा मी ठराव मांडत आहे . आम्ही सुध्दा त्या ठरावा ला समर्थन दिले . हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हायला पाहिजे . तो ठेकेदार वारंवार मागच्यावेळी रेट वाढवून देऊन सुध्दा तो काम करु शकला नाही. तरी सुध्दा प्रशासनाने प्रस्ताव आणला असता तर आम्ही मान्य केला असता . प्रशासनाने

सदर ठराव विखंडीत करण्यासाठी राज्य शासनाकडे पाठवला त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. समजा उद्या राज्य शासनाने तो ठराव विखंडीत केला नाही आणि आज आपण ही निविदा प्रक्रिया पूर्ण केली त्याच्यामध्ये दोषी कोण होणार सर्व स्टॅन्डिंग सदस्य हा टेक्नीकल मुद्दा आहे जोपर्यंत शासन निर्णय होत नाही तोपर्यंत घाईघाईने प्रस्ताव कशाला आणता. 16 मार्चला ठराव केला होता की त्याला काळ्या यादीत टाका आणि नविन निविदा काढा. तो प्रोसेस केलाच नाही. ती प्रक्रिया लवकरात लवकर केली असती तर चांगला ठेकेदार तिकडे आला असता. पालिकेचे पैसे वाचले असते आणि काम लवकर पूर्ण झाले असते . जो ठेकेदार एव ढी वर्ष काम पूर्ण करु शकला नाही त्यालाच आपण ठेका देतो म्हणजे ते काम पूर्ण करायची इच्छाच नाही. आमचा ह्या प्रस्तावाला विरोध आहे. आम्ही ठराव करणार. उद्या राज्य शासनानी निर्णय घेतला तर आम्ही सदस्य अडचणीत येऊ शकतो. हीच निविदा तुम्ही परत घेऊन येता फेरप्रस्ताव टेक्नीकल मुद्दा तरी समजून घ्यायला पाहिजे . प्रशासनाचे काय उत्तर आहे. तीन महिन्यांपूर्वी काळ्या यादीत टाकता परत तीन महिन्यांनी तो गोरा होतो. त्याचाच प्रस्ताव घेऊन येता. तुमचा काळ्या यादीत टाकायचा ठराव आहे. राकेश शहा आणि दिनेश जैन मला प्रशासनाकडून उत्तर पाहिजे सत्तापक्षाकडून नको.

धृवकिशोर पाटील :-

आम्ही आमची बाजू मांडतो.

अनिल सावंत :-

तीन महिन्यामध्ये काळ्याचा गोर केले ठीक आहे.

धृवकिशोर पाटील :-

तुम्ही नाव सांगितले म्हणून मी उत्तर देते.

अनिल सावंत :-

आम्ही आगर्युमेंट करणार. सुचक अनुमोदन त्याचेच आहे. त्याला आमचे पण समर्थन होते . आम्ही ठराव केला नव्हता. काम पूर्ण व्हाव म्हणून.

धृवकिशोर पाटील :-

काही चुकीचे झाले नाही काळ्याचे गोर नाही गोऱ्याचे काळे नाही.

अनिल सावंत :-

तुमचाच ठराव आहे. त्याला काळ्या यादीत टाका म्हणून ते काम करु शकणार नाही . ह्या तीन महिन्यात असे काय झाले.

धृवकिशोर पाटील :-

तीन महिने नाही त्याच्या अगोदर झाले. स्टॅन्डिंगने सदर विषयाचा ठराव केला होता विषय असा होता की प्रशासनाने हा विषय विखंडीत केला होता म्हणजे प्रशासनाला आमचा ठराव मान्य नव्हता आणि प्रशासनानी वारंवार डे लीगेशन केल. डिलीगेशन केल्या नंतर प्रशासनाला त्या गोष्टी पटल्या नाहीत . प्रशासनानी तो प्रस्ताव स्थायी समितीला फेर सादर केला **की तुम्ही हा प्रस्ताव पास करा. जरी शानाकडे विखंडीतसाठी पेन्डींग असेल जर आपण हा ठराव पास कला . शासन त्याच्यानंतर नियमात कार्यवाही करेल. आपण तो ठराव पास केला प्रशा सनाने सादर केल्यामुळे तो पास झाला. प्रशासनाने सादर केलाच कसा? काय गरज होती. प्रशासनाने का सादर केला त्याची निकड पाहता सादर केला . आता जे लोक ट्रांझीट कॅम्पमध्ये राहतात त्या लोकांची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे . त्यामुळे ते काम लवकर करणे गरजेचे आहे ही प्रशासना ची भुमिका होती. प्रशासनाने सभापती, महापौर, उपमहापौरांना सांगितले. डांगे साहेबांनीसुध्दा महापौर, सभापतींना फोन करुन सांगितले त्यामुळे सभापतींनी तो विषय घेतला.**

अनिल सावंत :-

साहेब, तुम्ही यु.डी. मध्ये काम केलेले आहे. एखादा ठराव प्रशासनाने किंवा आयुक्तांनी विखंडीत करायला पाठवला, त्या ठरावाच्या विरोधात जाऊन परत स्थायी समिती किंवा प्रशासनाला त्याचा निर्णय होईपर्यंत काम करता येते का? मला प्रशासनाची बाजू पाहिजे. साहेब, याच्यात तीन महिने ऑलरेडी लेट केला. ह्यांच्या चुकांमुळे तिकडचे झोपडपट्टीधारक नरकयातना भोगतात गेली 10 वर्ष हे लोक स्कीम पूर्ण करु शकले नाहीत. साहेब आम्हांला उत्तर पाहिजे. तर आम्ही ठराव करणार. जर तुम्ही एश्युरन्स देत असाल ह्याच्यामध्ये काही चुकीचे झाले नाही, कोणी सदस्य अडचणीत येणार नाही ते मला ऑन रेकॉर्ड पाहिजे. नाहीतर आम्ही ठराव करणार.

ध्रुवकिशोर पाटील :-

सन्मा. सदस्यांनी सांगितले, तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग होते तेव्हा काँग्रेस राष्ट्रवादीची सत्ता होती. केंद्रामध्ये राज्य होते . मिरा भाईंदरमध्ये काँग्रेस , राष्ट्रवादीचे राज्य होते . परंतु काँग्रेस, राष्ट्रवादी ही स्कीम पूर्ण करु शकले नाही आणि ही स्कीम खुप बारगळली. ह्या स्टॅन्डीगमध्ये ग्वाही देतो. भारतीय जनता पार्टीच्या कार्यकालामध्ये ही बी.एस.यु.पी. योजना पूर्ण करुन दाखवणार.

अनिल सावंत :-

ह्याच्यासाठी 12 वर्ष घेतली ना. तीन महिने ऑलरेडी लेट केलात . एवढ्यात काम सुरु झाले असते.

दिपक खांबित :-

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. स्थायी समितीत जो ठराव केला होता दि. 16.03.2020 ला 117 नंबर आणि कामाची फेरनिविदा मागवायला सांगितली होती . ठेकेदाराला काळ्या यादीत टाकायला सांगितले होते. ह्याच्यावर आम्ही अभ्यास केला. जेव्हा ठराव केला होता की ह्या ठेकेदाराकडून काढून घ्या दि. 31/03/2017 ला ही स्कीम बंद झाली . त्यामुळे आपल्याकडे पैसे यायचे बंद झाले . आपण शासनाला बोललो आम्हाला पैसे द्या.

अनिल सावंत :-

2017 ला स्कीम बंद झाली तेव्हा सेंट्रलला कोणाचे सरकार होते.

(सभागृहात गोंधळ)

ध्रुवकिशोर पाटील :-

ही स्कीम तुम्ही सुरु केली. तुमचे अपयश आम्ही सिध्द करणार.

अनिल सावंत :-

ऑन रेकॉर्ड आहे. सेंट्रल गव्हरमेंटने फंड द्यायला बंद केले म्हणून ती स्कीम बंद पडली.

दिपक खांबित :-

त्यामुळे आपण ही स्कीम करु शकलो नाही आणि काम बंद झाले. तुम्ही बोलले की ठेकेदाराने काम केले नाही. तुम्ही ठरावात म्हंटले की ठेकेदाराला ब्लॅक लिस्ट केले आहे.

अनिल सावंत :-

आम्ही नाही त्यांनी म्हंटले आहे.

दिपक खांबित :-

स्किम पैशामुळे बंद झाली. त्यामुळे त्याला ब्लॅकलिस्ट करता येणार नाही. फेर निविदा मागवली तर अजून रेट वाढले आहेत आणि दर वगैरे जास्त येऊ शकतील. त्यामुळे आम्ही तुम्हाला रिक्वेस्ट केली. हा ठराव मंजूर करुन द्या आणि हा विषय आणला . आपल्या ठरावात मागणी केली आहे . त्याप्रमाणे प्रस्ताव दिला आहे. त्यामुळे ह्याच्यात काही फायदेशीर बाब निर्माण होणार नाही.

अनिल सावंत :-

तुमचा जो प्रस्ता व आहे विखंडीत करा तो राज्यशासनानी फेटाळला तर काय करणार ? त्याला काळ्या यादीत टाका म्हणून मान्य केले. उद्या जर यू.डी. ने तो ठराव मान्य केले नाही आणि ही निविदा रेग्युलराइज्ड केली तर आम्ही अडचणीत येऊ शकतो की नाही तुम्ही यु .डीमध्ये काम केले आहे. तुम्हाला अनुभव जास्त आहे. तुम्ही आम्हाला ॲश्यूरन्स द्या मग आम्ही ठराव करत नाही . नाहीतर आम्ही ठराव करणार.

स्नेहा पांडे :-

उधर कैसे रह रहे है हमको हालत मालूम है तो उस वक्त क्यों नही किया अभी क्या क्या चर्चा होती है|

निला सोंस :-

मा. सभापती महोदय मार्च में जब यह विषय आया था तब इस विषय पे चर्चा हुई थी औ र कहाँ था की यह जो बी .एस.यू.पी. योजना है वह कई सालो से ॲक्टीव योजना है | इसका समाधान निकालना चाहिए| ब्लॅक लिस्ट करना इस वक्त समाधान नही हो सकता कुछ समाधान निकालिए और कॉन्ट्रॅक्टर को बोलिए इस तरह की चर्चा हुई थी| लेकिन ठराव पास किया गया और कॉन्ट्रॅक्टर को ब्लॅकलिस्ट किया गया पहले सर्व सहमतीसे विखंडीत किया जाता है तब जो सदस्य होने के नाते हम बात कर रहे है वो चीज नही होती हम अपना समर्थन देते है और आज तीन महिने के बाद उसीपे विरोधाभास मतलब यहाँ विरोधाभास जल्दी देखने मिलता है| और वो भी बिना लॉजिक के एक लॉजिक हो तो समझ में आता है| तीन महिने पहले बी.एस.यू.पी. योजना के इतने लोग जो त्रस्त है तब पर्वा नही थी आज तीन महिने बाद उन्हीको रिजेक्ट करके आज सिलेक्ट कर रहे है| यह सिधे सिधे कोई भी सदस्य सोचेगा इसके पिछे भष्ट्राचार की आशंका है| तीन महिने बाद क्यों?

दिपक खांबित :-

कोई ठराव होता है तो 3 महिने का टाईम देना पडता है|

निला सोंस :-

उस वक्त जिसको रिजेक्ट किया उसको आज सिलेक्ट कर रहे हो | आप चार महिने बाद लाइए विषय वो नही है| विषय यह है| जिनको आपने रिजेक्ट किया, जिनको आपने ब्लॅकलिस्ट बोला आज चार महिने आप उनके उपर पावर प्रॅक्टी स खेल रहे थे | चार महिने पहले बी .एस.यू.पी. में वो त्रस्त थे तब समाधान नही निकाल रहे थे| आज चार महिने बाद आप पावर प्रॅक्टीस खेल रहे थे| वहाँ शासन विखंडन करके भेजते है | फिर हम शासन को भी ओव्हर रुल करके आन्सर नही सून रहे है | सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटीलने कहाँ लेकिन उन्होंने जो भी कहाँ शासन ने यह बोला है प्रशासन ने यह बोला है पर वो लिखीत रुप में नही है | मतलब महापौर से उपमहापौर से बात हुई है कमिशनर से बात हुई है | कोई लिखीत रुप में है क्या की प्रशासनने यह बोला है मतलब यहाँ दिशाभूल करके हम सदस्य किसी गलत कार्य का हिस्सा बनने मे इंटरेस्टेड नही है | मैं अपने लिए विशेष कर कहना चाहूँगी की यह विरोधाभास क्यों है| महापौर से उपमहापौर से कमिशनर से बात हुई उसका कोई लिखीत नही है और नाम बोले जा रहे है| या तो लिखीत दिजीए की महापौर ने यह प्रशासन को बोला है यह डायरेक्शन दिया है|

धृवकिशोर पाटील :-

मॅडम आपने जो आरोप लगाया|

निला सोंस :-

मैंने आरोप नही लगाया आपने जो बोला उसका पूरावा दिजीए|

धृवकिशोर पाटील :-

विषय ऐसा है यह ठराव रिजेक्ट करने के बाद एक महिने के बाद प्रशासन ने वापस गोषवारा दिया| प्रशासन को यह ठराव को पास करना है | सदस्य ने थोडी कहाँ है प्रशासन ने गोषवारा दिया है इसका मतलब प्रशासन को इस विषय को पारित करना है|

निला सोंस :-

